दहिसर पोलीस ठाणे, मुंबई
दिनांक २३/०८/२०२६.

**वार्तापत्र ( PRESS NOTE )**

**( अवैद्द अग्निशस्त्र गुन्हयातील आरोपीतास अटक करुन अग्निशस्त्र जप्त केलेबाबत )**

दिनांक २१/०८/२०२६ रोजी १७.३५ वा च्या सुमारास गुन्हे प्रकटीकरण अधिकारी सपोनी इंद्रजीत पाटील यांना त्यांच्या गुप्त बातमीद्वारा मार्फत एक इसम दहिसर चेक नाका परिसरामध्ये देशी अग्नीशस्त्र स्वत: जवळ बाळगून वावरत असल्याबाबत माहिती प्राप्त झाली.सदरची माहिती मा. वरिष्ठांना दिली असता मा.वरिष्ठांनी सदर माहितीची शहानिशा करुन करवाई करण्याचे आदेशीत केले. सपोनी इंद्रजीत पाटील व गुन्हे प्रकटीकरण पथक यांनी अग्निशस्त्र स्वत:जवळ बाळगलेला इसम नामे संदीप रमाशंकर उपाध्याय, वय ३४ वर्षे यास दहिसर चेक नाका, महानगर गॅस पंपा समोर, दक्षिण वाहिनी, दहिसर पूर्व मुंबई येथून योग्य बळाचा वापर करून सीताफिने ताब्यात घेऊन जागीच दोन पंचांसमक्ष त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या ताब्यात विनापरवाना खालील नमुद वर्णनाचा एक देशी बनावटीचे अग्निशस्त्र (पिस्टल) व सहा जिवंत काडतूस मिळून आले. नमूद आरोपीस इसमाने मा. पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांच्या हत्यार बंदी आदेशाचे उल्लंघन केले म्हणुन त्यास पुढील कायदेशीर कारवाई करिता पोलीस ठाणे येथे घेवून आलो. सहा.फौ १४८९८/ ऑस्कर कोलासो यांनी सरकारपक्षा तर्फे त्याच्या विरुध्द तक्रार दिली असता त्यांचा सविस्तर जबाब नोंद करुन दहिसर पोलीस ठाणे येथे वि.स्था.गु.र. क्र. १२४१/२६ कलम ३,२५ भारतीय हत्यार कायदासह कलम ३७(१) (अ) सह १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. इसम नामे संदिप रमाशंकर उपाध्याय यास सदर गुन्हयात अटक करण्यात आले आहे.

**आरोपी संदिप उपाध्याय याच्या अंगझडतीमध्ये मिळून आलेल्या अंग्नीशस्त्राचे वर्णन:-**

१) रू. ४२,०००/- रू. कि. ची एक लोखंडी मुठ असलेले देशी बनावटीचे लोखंडी पिस्टल, त्याचे लोखंडी बॅरेलची लांबी १६.६० सेमी, बॅरेलचा व्यास अंदाजे ०.८ से.मी, मुठीची लांबी ०९.५० से.मी, मुठीची रुंदी ०४.१५ से.मी, लोखंडी मुठीवर दोन्ही बाजुस काळया रंगाचे फायबरचे आवरण त्यावर दोन्ही बाजूस दोन खिळे, हॅमर व ट्रिगर गार्डसह असलेली, त्यास २.८० सेमी रुंदीची व १०.२५ से.मी लांबीची मॅग्झीन असलेली जु.वा.

२) प्रत्येकी ५००/- रू.कि.चे ०६ जिवंत काडतुसे सदरच्या प्रत्येक काडतुसच्या पाठीमागील बाजूस इंग्रजीमध्ये 32 HPM 25 असे नमुद असलेले एकुण किंमत - ३०००/- रुपये

असे एकूण रू. ४५,०००/- किमतीचे एक देशी बनावटीचे लोखंडी पिस्टल व ०६ जिवंत काडतुस ही मालमत्ता हस्तगत करण्यात आली आहे.

**अटक आरोपीताचे नाव व पत्ता:-**

संदिप रमाशंकर उपाध्याय वय - ३४ वर्षे, धंदा- फाबरीकेशन, रा.ठि- रूम नं ०३, न्यु गणेशवाडी वेल्फेअर सोसायटी क्र ०२, लक्ष्मण नगर, ए.व्हि.एम शाळेच्या पाठीमागे, कुरार व्हिलेज, मालाड पुर्व, मुंबई.

सदरची कामगिरी ही मा. श्री शशिकुमार मीना, अप्पर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, मा. श्री. गजानन शिवलिंग राजमाने , पोलीस उप आयुक्त उत्तर परिमंडळ ०३, मा. श्री.जयराज रणवरे , सहायक पोलीस आयुक्त, दहिसर विभाग,मा. श्री. सर्जेराव पाटील वरिष्ठ पोलीस निरीक्षक दहिसर पोलीस ठाणे, मा. श्री मारूती सांगळे पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली खालील नमूद पथकाने केली.

**गुन्हे प्रकटीकरण पथक:-**

**सपोनि इंद्रजित पाटील, स.फौ. राजू नार्वेकर, पो.ह. ऑस्कर कोलासो, पो.ह. चुंगीवडीयार, पो.शि. विलास आव्हाड, निलेश शनवार,**

-----oooo------